नियमित दिवाणी दावा ०६/२०१८

दत्तात्रय रामचंद्र शेटे वि.भगवान तुकाराम शेटे
नि.नं. ३७/लगत / सी

**उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री. एम. डी. कराडे वकील यांच्यामार्फत पुन्हा शपथेवर सुरु,**

१५. हे म्हणणे खरे आहे की, एखादी मिळकत विक्री करावयाची झाल्यास जी व्यक्ती मिळकत विकते ती स्टॅम्प खरेदी करते. आम्ही दोघांनी स्टॅम्प खरेदी केलेला आहे. स्टॅम्प खरेदी करतेवेळी मी तेथे हजर होतो. आम्ही दोघांनी मिळून सदरचा स्टॅम्प खरेदी केलेला आहे. मी सदरच्या स्टॅम्पवर खरेदी करणार म्हणून सही केलेली आहे. सदरचा स्टॅम्प किती तारखेस खरेदी केला त्याची तारीख मला आठवत नाही. सदर स्टॅम्प मी कोणाकडून खरेदी केला त्याचे नाव मला आठवत नाही. सदरचा स्टॅम्प मी कोल्हापूरमध्ये खरेदी केलेला होता. माझ्या माहितीनुसार स्टॅम्प विक्रेत्याचे दुकान शिवाजी पुतळा ते बिंदू चौक यांच्या दरम्याने होते. मी प्रताप डी जाधव यांचेकडून स्टॅम्प खरेदी केला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रताप डी जाधव यांचेकडून खरेदी केलेला स्टॅम्प मी या कामात हजर केलेला नाही. मी भगवान यास कोणत्या कोणत्या तारखेला पैसे दिले त्याचा विशिष्ट तपशील सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी सुरुवातीला २,८०,०००/– दिले व नंतर ५००० व नंतर १०००० नंतर ५००० व नंतर ५००० हजार दिले होते अशी एकूण ०३,०५,०००/– रक्कम मी दिली होती. मी २, ८०,०००/– केव्हा दिले त्याची तारीख व वर्ष मला आठवत नाही. मी सदर पैसे करार करण्याच्या अगोदर दिले होते. मी करार करण्याच्या अगोदर अंदाजे सहा महिने आदी पैसे दिले होते. मी सदर पैसे दिल्याबाबत लेखी नोंद लिहून घेतली नव्हती. सदर तारखेस माझेकडे रक्कम रु. २, ८०, ०००/– होती याबाबतचा लेखी पुरावा मी हजर करणार नाही. मला बँकेचे व्यवहार माहीत नाही. माझे के.डी.सी बँक व बँक ऑफ इंडिया येथे खाते आहे. सदर खात्यांचे चेकबुक माझ्याकडे नाही. सदर रक्कम रु. २, ८०, ०००/– माझ्या खात्यावरून भगवान यांच्या खात्यावर पाठवायला मला अडचण नव्हती. मी एकूण दिलेली रक्कम ही कोण कोणत्या तारखांना दिली त्याबाबतचा विस्तृत तपशील करारात लिहायला मला अडचण नव्हती.

१६.माझ्या माहितीनुसार करारात मी सात महिन्यांची मुदत लिहलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सात महिन्यात व्यवहार पुर्ण झाला नाही तर करार रद्द होईल अशी अट घातली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर करार सात महिन्यात न पुर्ण झाल्यानंतर मी प्रतिवादी यांना सदर करार रद्द झाल्याबाबत लेखी कळविले नव्हते. मी प्रतिवादी यास वारंवार सदर करार रद्द झाल्याबाबत तोंडी कळविले होते. मी प्रतिवादी यास करार रद्द झाल्याबाबत चार ते पाच वेळा तोंडी कळविले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर करार रद्द झाल्यामुळे त्याबाबत कोर्टात दाद मागण्याचा मला अधिकार नाही. मी भगवान यांच्या सहया दाखविल्यास ओळखू शकतो. मी भगवान यास सही करताना एक वेळा पाहिलेले होते. सदर स्टॅम्पवर सही करण्यापूर्वी मी भगवान यास सही करताना पूर्वी पाहिलेले नव्हते. (साक्षीदारास नि.२३ वरील कैफियत दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि. २३ वरील चारही सहया भगवान यांच्या आहेत. (साक्षीदारास नि.१५ वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि. १५ वरील दोन सहया भगवान यांच्या आहेत. (साक्षीदारास  अभिलेखावरील वकीलपत्र व पत्ता मेमो दि. २२.१२.२०१७ दाखविण्यात आले. ) आता मला दाखविण्यात आलेल्या अभिलेखावरील वकीलपत्र व पत्ता मेमो दि. २२.१२.२०१७ वरील तीन सहया भगवान यांच्या आहेत. (साक्षीदारास पोस्ट रिसीट दाखविण्यात आली.) सदर पोस्ट रिसीटच्या खाली भगवान यांची सही आहे.  (साक्षीदारास नि.९, नि.१४, वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि. ९ नि. १४ वरील दोन सहया भगवान यांच्या आहेत. नि. २१ वरील स्वाक्षरी भगवान यांची दिसून येत नाही.

**उलटतपास मध्यांतरापर्यंत तहकूब**

श्रवाणोत्तर स्वीकृत,

**सही/–**

**( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा

दि. १२/१२/२०२५.